‘ग्रामीण भागातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबातील महिलांचे शिक्षण समाजशास्त्रीय अभ्यास"

प्रा.डॉ. यादव घोडके,

समाजशास्त्र विभाग,

वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा जि. बीड.

प्रस्तावना :

महाराष्ट्र जमीन सुधारणा कायद्यामुळे कधी नाही तेवढे महत्वपूर्ण सुधारणा घडुन आल्या आहेत. या कायद्यामुळे राज्यात अनेक महिलांच्या नावावर जमिनी करण्यात आल्या आहेत. त्यांचा परिणाम म्हणजे समाजसुधारणा आपोआपच होत आहे. विविध पंचवार्षिक योजनांच्या आधारे जलसिंचनाच्या सोयी, पिण्याच्या पाण्याची सोय, आणि रस्ते बांधणी केली जाऊ लागली. शेतीच्या कामासाठी बाजारपेठा निर्माण केल्या जाऊ लागल्या आहेत. शेतीच्या आणि शेतकज्यांच्या विकासासाठी सहकार तत्व १९०४ पासून निर्माण केले आहे. या सर्वांचा फायदा हा गरीब व मध्यम शेतकरी महिला व पुरषांना न होता श्रीमंत शेतकज्यांनाच अधिक प्रमाणात झाला आहे असे निदर्शनासयेते. महाराष्ट्र राज्यात मराठा जात प्रभावी असली तरी त्यातील काहीलोक श्रीमंत आहेत. परंतु बहूतांशी मराठा कुलबी हे निर्धण, अल्पभूधारक व भूमिहीन आहेत. तसेच राज्यात अनेक जाती भूमिहीन आहेत. त्यांचा आर्थिक, सामाजिक आणि शौक्षणिक विकास करणे आवश्यक आहे. जे सधन शेतकरी होते त्यानीच विविध योजनेचा लाभ घेतला आहे. इतके लोक गरीब असल्यामुळे निर्धणच राहीले आहेत.१

भारत सरकारने पहिल्या पंचवाषक योजनेत शेती क्षेत्रासाठी केलेली तरतुद समाधनकारक असल्यामुळे त्यापुढे एखादी अपवादात्मक पंचवार्षिक योजना सौडता शासनाने शेती क्षेत्रासाठीची तरतुद मोठया प्रमाणात कमी केली. शासनाचा शेतीकडे पाहण्याचा उदासीन दृष्टिकोन शेतकज्यांच्या जिवर बेतला. त्यात शिक्षणचे प्रमाण कमी असल्यामुळे संपूर्ण शेतकरी कुटुंब खचले आणि आत्महत्येचे मार्ग जवळ करण्यात आला.

शेतीसाठी केवळ अडीच टक्के तर सिंचनासाठी ०.३५ टक्के म्हणजेच अध्या टक्क्यापेक्षा कमी आहे. म्हणून शेतकरी आत्महत्येसारख्या अधोरी मार्गाचा अवलंब करू लागला आहे. शेतकज्यांच्या अर्थकारणात महत्त्वपूर्ण बदल करून शेतीतील गुंतवणुक मोठया प्रमाणात वाढविण्याची आवश्यकता आहे. तरच शेतकरी आत्महत्या थांबतील व शेतकज्यांच्या महीला विधवा होणार नाहीत आणि शेतकज्यांचे कुटुंब उघडयावर पडणार नाही. या उलट सुधारणा झाल्याशिवाय राहणार नाही हे त्रिकाल बाधीत सत्यआहे.

उद्दिष्टये :

ग्रामीण भागातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांचा शौक्षणिक दृष्टीकोण या विषयाची उद्दिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) शेतकज्यांच्या आत्महत्येचे प्रमाण पाहाणे.

२) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची शौक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

३) शेतकरी आत्महत्ये अगोदर व नंतर आर्थिक व सामाजिक घटकांचा अभ्यास करणे.

आज देशात सर्वत्र अल्पभूधारकतेची प्रक्रिया वेगाने फोफावत आहे. त्यामुळे अनेक जमिनी पीक अयोग्य व आर्थिक दृष्टया निरूपयोगी ठरत आहेत. त्यात विधवा महिला शेतकरी शेतीतून उत्पन्न कमी काढते कारण मशागत कमी होऊ वेळेवर होत नाही असे दिसते.

लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे वरच्या स्तरातल्या जमिनी विभागल्या जाऊन त्यांचा आकार घटतो आहे. तर खालच्यास्तरात मुळातच छोटया असलेल्या जमिनीचे मालक भूमिहीन होत आहेत. त्याचा वाईट परिणाम म्हणजे

शेतकरी आत्महत्येत वाढ झाली, सर्व जबाबदारी महिलांवर पडल्यामुळे कुटूंबाच्या सर्व गरजा भागविण्यास असमर्थ ठरत आहेत. अशाकुटूंबांची हाल होतांना दिसते.

कर्नाटकातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या कारणाबाबत अलिकडेच झालेल्या एक अभ्यासाच्या दरम्यान असे लक्षात आले की, शेतकरी कुटुंबाला तगधरण्या इतकी ही जमीन अनेक कुटुंबाकडे शिल्लक राहीलेली नाही.२

तक्ता क्र. ०१

मराठवाडयातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची आकडेवारी

अ.क्र.	१	२	३	४	५	६	७	८	९
जिल्हा	बीड	नांदेड	उस्मानाबाद	औरंगाबाद	लातूर	परभणी	जालना	हिंगोली	एकूण
शेतकरी आत्महत्या	५८६	१७७	१५४	१३१	९१	८४	६६	३५	१३८४

वरील तक्ता क्र. ०१ मध्ये मराठवाडयात १३८४ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. नापिकीत कर्जवारीपणा आणि शिक्षणाचा अभाव असल्यामुळे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत चालले आहे असे प्रत्येक्षात मुलाखती घेतांना निदर्शनास आले आहे.

ग्रामीण भागात पुरूषाचे प्रमाण कमी आहे. त्यात महिलांचे शिक्षणाचे प्रमाण पुरूषापेक्षा कमी असल्यामुळे अज्ञान आणि अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त आहे. कुटुंब प्रमुखाने आत्महत्या केल्यामुळे कुटुंबातील सर्व समस्यांना महीला सक्षमपणे तोंड देऊ शकत नाही. दु:खाचा डोंगर कुटुंबावर कोसळलेला असल्यामुळे शेती खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ कुटुंबातील महिलांना बसत नाही.

तक्ता क्र. ०२

विदर्भ – मराठवाडयात सरासरी रोज ०३ शेतकरी आत्महत्या

मराठवाडा			विदर्भ	
अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	शेतकरी आत्महत्येची संख्या	जिल्ह्याचे नाव	शेतकरी आत्महत्येची संख्या
१)	औरंगाबाद	९८	अमरावती	२०८
२)	जालना	६४	अकोला	९६
३)	परभणी	६४	यवतमाळ	१४८
४)	हिंगोली	३२	बुलढाणा	१३८
५)	नांदेड	१०७	वाशिम	५०
६)	बीड	१४७	वर्धा	६०
७)	लातुर	८४		
८)	उस्मानाबाद	१०८		
	एकुण	७०४		
		७००		

जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्याच्या कालावधीत दोन्ही विभागात १४०४ शेतकऱ्यांची जवन संपवले आहे.

निसर्गाची अवकृपा, विस्कटलेली आर्थिक घडी, नापिकी, दूष्काळी परिस्थिती आणि कोटुंबिक चिंता या कारणामुळे विदर्भ – मराठवाडयात दिवसाकाठी तीन शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे धक्कादायक वास्तव आहे.

अर्धवट शिक्षीत असल्यामुळे आणि शिक्षणाचा अभाव असल्यामुळे ग्रामीण भागात शेतकरी आत्महत्या होत आहेत. शेतकरी आत्महत्येनंतर त्या कुटुंबातील महिला अनेक समस्यांना तोंड देतांना दिसून येते. शासकीय मदत वेळेवर मिळत नाही. जी मिळते ती अल्पस्वरूपाची आहे. ७०,०००/- रू. दामदूप्पटी वर टाकतात, तर ३०,०००/- रू. रोख स्वरूपात देतात. मिळालेल्या रक्कमेतून त्या कुटुंबांचा खर्च भागविता येत नाही.

उपाय योजना:

१) शेतकरी आत्महत्येच्या मदतीमध्ये दूप्पट वाढ करावी.

२) शेती उत्पन्नासाठी कायम स्वरूपी योजना आखावी.

३) शेतकरी मदत हा सर्वस्वी उपाय योजना नाही.

४) शेतकरी नुकसान भरपाई दूप्पट करण्यात यावी.

सारांश :

ग्रामीण भागात शिक्षणाचा अभाव आहे. प्रत्येक गावात ४ थी पर्यंत शाळा आहे. काही आंतरावर ७ वी पर्यंत शिक्षणाची व्यवस्था दिसून येते तर जास्त आंतरावर १० वी पर्यंत शिक्षण घेता येते. उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. महागडया शिक्षणामुळे महाविद्यालयीन शिक्षण ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील व्यक्ति घेऊ शकत नाही बज्याच शेतकरी कुटुंबातील मुलाने पौशा अभावी शिक्षण घेत नाही तर सुरू असलेले शिक्षण मध्येच सोडून दिलेलेआहे असे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) गायकवाड श्रीकांत – भारतातील सामाजिक चळवळी अरूणा प्रकाशन, लातूर, सप्टेंबर – २००१ पृ.क्र. २८.

२) बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई – २०१०.

३) दिवसाला तीन शेतकरी संपवत आहेत जीवन : सरकार बद्दल नागरिकांमध्ये नाराजी दै. सकाळ दि. ०१/१२/२०१५.

४) विदर्भ – मराठवाडयात सरासरी रोज ०२ शेतकरी आत्महत्या दै. दिव्य मराठी दि. २८/०८/२०१६.

५) बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थव सांख्यिकीय संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई – २०१२.

६) शेतकज्यांच्या आत्महत्येचे रेकॉर्ड दै. लोकमत दि. १८/११/२०१५.